# लोकमत

महाराष्ट्राचा मानबिंदू

पृष्ठे : १२+४ = १६, किंमत : ₹ ४.००

सातारा, बुधवार, दि. १६ जानेवारी २०१९



ग्रंथालय


## शिबिरातून व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास

**प्रेरणा कट्टे :** डी. पी. भोसले कॉलेजच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिराची सांगता

लोकमत न्युज नेटवर्क

**कोरेगाव :** 'ज्ञानाच्या चौकटीच्या बाहेर जाऊन बाह्यज्ञान आत्मसात करुन घेतल्यास अपेक्षित यश मिळवू शकतो. राष्ट्रीय सेवा योजनेच्या शिबिरातूनच व्यक्तिमत्त्वाचा सर्वांगीण विकास होत असतो,' असे प्रतिपादन पोलीस उपविभागीय अधिकारी प्रेरणा कट्टे यांनी केले.

शिवाजी विद्यापीठ कोल्हापूर, डी. पी. भोसले कॉलेज व जिल्हा परिषद सातारा यांच्या संयुक्त विद्यमाने कोरेगाव तालुक्यातील आझादपूर येथे आयोजित केलेल्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या विशेष श्रमसंस्कार शिबिराच्या समारोपाच्या कार्यक्रमात प्रमुख पाहुण्या म्हणून प्रेरणा कट्टे बोलत होत्या. अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे उपप्राचार्य राजेंद्र निकम उपस्थित होते. यावेळी स्वयंसेवकांनी जलसंवर्धन, ग्रामस्वच्छता, ग्रामसर्वेक्षण, पर्यावरण संरक्षण, आपत्ती व्यवस्थापन, महिला सबलीकरण, मानसिक आरोग्य, व्यक्तिमत्त्व विकास, एडस् जनजागृती आदी उपक्रम राबविले.




कोरेगाव येथे प्रेरणा कट्टे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

यावेळी प्रबोधनपर व्याख्यानात श्रीधर साळुंखे, प्रा. रामदास निकम, प्रा. सचिन निकम, डॉ. सतीश रायकर, प्रा. चंद्रकांत जावळे, प्रवीण सोनावले आदी मान्यवरांनी विचार मांडले. कार्यक्रम अधिकारी प्रा. डी. डी. पाटील यांनी प्रास्ताविक केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा. नीलेश गोसावी यांनी अहवाल वाचन केले.

कार्यक्रमास उपसरपंच राजेंद्र लवळे, ज्येष्ठ नागरिक सुरेश लवळे, ग्रामसेविका स्मिता धायगुडे, तंटामुक्तीचे अध्यक्ष हणमंत फडतरे, उपाध्यक्ष हणमंत शिंदे, पोलीस पाटील महेश राऊत, अजित लवळे, राजेंद्र भोसले, ज्ञानेश्वर घोडके आदी उपस्थित होते. डॉ. सतीश रायकर यांनी सूत्रसंचालन केले. प्रकल्प अधिकारी प्रा. प्रदीप पवार यांनी आभार मानले.